Vol 3 Issue 4 Jan 2014

Impact Factor : 1.6772 (UIF)

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Review Of Research
Vol. 3, Issue. 4, Jan. 2014
ISSN:-2249-894X

Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या जीवनाला प्रकाशाची वाट दाखविणारे निष्कांचन वृत्तीचे शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे*

*कमलाकर कोंडिबा राऊत*

***सारांश :***

आपली ारतीय संस्कृती ही एक श्रेष्ठ, उदात्त व आदर्श संस्कृती म्हणून सर्व जग र नावाजली जाते. आपल्या देशात होऊन गेलेले संत–महंत, धर्मसंस्थापक–धर्मसुधारक, समाजसेवक–समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ–शिक्षणमहर्षी, राष्ट्र क्त–क्रांतिकारक, विचारवंत–तत्त्वज्ञ इत्यादींनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, नीतिमत्ता, संवेदनशीलता, सकारात्मक विचार इत्यादी मूल्यांची जोपासना करून, त्यांची शिकवण देऊन ारतीय संस्कृती सामर्थ्यशाली व प्र ावशाली होण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

## *प्रस्तावना :*

देश जोडला जातो माणसा–माणसांतून. माणूस घडविला जातो शिक्षणातून. हे शिक्षण पूर्वी सकळ मानवजातीसाठी नव्हते. विशिष्ट वर्गापुरतेच ते मर्यादित केले गेले होते. विशेषतः दलितांना व स्त्रियांना शिक्षणापासून सवर्णांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवले होते. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीत दलितांसाठी व मुलींसाठी शिक्षणाचा प्रारं करून त्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. हा वारसा पुढे काही शिक्षणमहर्षींनी समर्थपणे जोपासला. ज्यांनी जनसामान्यांच्या शिक्षणासाठी तनमनधनाने सेवा कार्य केले, त्यासाठी आपले आयुष्य चंदनासमान झिजविले, अशा स्वातंत्र्योत्तर शिक्षणमहर्षींमध्ये बापूजी साळुंखे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

## *शिक्षणविषयक ूमिकाः*

बापूजी साळुंखे यांचे जीवनकार्य म्हणजे या मराठमोळ्या मातीला पडलेले एक सुंदर स्वप्न होय, जे या मातीतील माणसांच्या जीवनउन्नयनासाठी साकार होत गेले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याात बापूजींनी उत्स्फूर्तपणे व तळमळीने कार्य केले होते. मानवतेचे उपासक असलेले बापूजी स्वातंत्र्य, समता, बंधुता, चारित्र्य, परोपकार इत्यादी मूल्यांची जोपासना स्वतःच्या व समाजाच्या जीवनात घडावी यासाठी प्रारं ापासून प्रयत्नरत राहिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाच्या माध्यमातून हाच वसा व वारसा जोपासण्यासाठी ते कार्यरत राहिले. कर्मवीर ाऊराव पाटील यांच्यासमवेत रयत शिक्षण संस्थेत दिलेले योगदान असेल, वा स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून त्याचे वटवृक्षात रूपांतर होईपर्यंत केलेले अतुलनीय व श्रेष्ठ कार्य असेल, त्यावरून बापूजींची शिक्षणविषयक ूमिका पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

"शिक्षण हे पावित्र्याने दिले पाहिजे आणि हे शिक्षण दिल्यानंतर माणसाने विवेकी, त्यागी होऊन समाजाची सेवा करावी ही त्यांनी धारणा होती."[1] या धारणेतूनच त्यांनी शिक्षणक्षेत्रात आजीवन कार्य केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या स्थापनेमागील ूमिका बापूजींनी एका लेखात नोंदविली आहेः "स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतरतेच्या, ध्येयनिष्ठेच्या प्रेरणा जिवंत ठेवाव्यात, किंबहुना त्या अधिक प्रज्वलित कराव्यात म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची माझ्या मित्रांना घेऊन स्थापना केली."[2] यावरून ध्येयनिष्ठेच्या प्रेरणा अधिक प्रज्वलित करण्याची बापूजींची शिक्षणसंस्था स्थापनेमागील ूमिका असल्याचे दिसून येते. शिक्षणातून माणूस संस्कारसंपन्न बनला पाहिजे. "केवळ ाकरी मिळविण्यासाठी नव्हे तर मिळालेली ाकरी केवळ स्वतःसाठी राखून न ठेवता उपाशीपोटी शेजाऱ्यात वाटून खावयाची असते. ही जाणीव शिकणाऱ्यात निर्माण केली पाहिजे."[3] या अंतःस्थ ूमिकेतून बापूजींनी शिक्षणसंस्थाच्या माध्यमातून

असंख्य विद्यार्थ्यांमध्ये ही जाणीव निर्माण केली.

बापूजींनी शिक्षणकेंद्र हे समाजपरिवर्तनाचे प्र ावी माध्यम समजले. शिक्षणसंस्था म्हणजे एक संस्कारकेंद्र, सांस्कृतिककेंद्र आहे, असे ते मानत असत. "शिक्षणकेंद्र म्हणजे विद्यार्थी, शिक्षक व ज्या गावात वि ागात शाळा आहे, त्यातील 'समाज' यांच्या उद्धारार्थ असणारे एक सांस्कृतिककेंद्र–विद्यामंदिर होय."[4] अशी बापूजींची धारणा होती. म्हणूनच त्यांनी महाराष्ट्र र त्या त्या  ागातील समाजाच्या उद्धारासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शाखा उघडून शिक्षणाची गंगा जनसामान्यांपर्यंत पोहोचविली. 'ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार यासाठीच शिक्षणप्रसार' हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. यातील प्रत्येक शब्द सर्व शिक्षणाचे सार सांगून जाते. कोणत्याही शिक्षणसंस्थेला शो ेल, सार्थ ठरेल असे हे ब्रीदवाक्य शिक्षणाचा मूळ उद्देश अधोरेखित करतानाच शिक्षणाच्या माध्यमातून जीवनाच्या सार्थकतेचा मूलमंत्र देऊन जाते. 'ज्ञान म्हणजे शहाणपण' असे एका विचारवंताने म्हटले आहे. ज्ञानसंपन्न, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा व सुसंस्कारित असा विद्यार्थी घडावा ही बापूजींची शिक्षणदृष्टी आजही शिक्षणक्षेत्राला प्रकाशाची वाट दाखवीत आहे.

### *शिक्षणाचे ध्यासपर्वः*

बापूजी साळुंखे यांचा जन्म पाटण तालुक्यातील रामापूर येथे 9 जून 1919 रोजी झाला. ते साधारणतः एक वर्षाचे असतील तेव्हा त्यांची आई तानुबाईंचे देहावसान झाले. आई काय असते हे कळण्यापूर्वी ते आईला पोरके झाले. 1926 साली त्यांच्या शालेय शिक्षणाचा प्रारं  झाला. शिक्षणाची अ िरुची वृद्धिंगत होत गेली. वयाच्या 12 व्या वर्षी बापूजींवर पुन्हा दुःखाची कुऱ्हाड कोसळली. त्यांचे वडील ज्ञानोजीराव यांचे निधन झाले. बालपणीच झालेले हे दोन्ही आघात बापूजींनी पचविले. 1933 साली बापूजींनी सातवीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. 1940 साली त्यांचा बेळगाव येथे विवाह झाला. याच वर्षी बापूजी सोंडूर संस्थानात राजकुमारांना शिकवण्यासाठी राजगुरू बनले.

"1942 पूर्वी माझे कार्य फक्त शिक्षकाचे होते. 15 प्राथमिक शाळा चालवीत होतो. सोंडूर संस्थानातही राजपुत्रांना शिकविण्यासठी राजगुरू म्हणून व शिवाजी मंदिरातला शिक्षक म्हणून माझी नेमणूक झाली होती. असा माझा पिंड शुचितेच्या मार्गाचा... सोंडूर संस्थानात राजपुत्रांना शिक्षक असताना राजपुत्रांबरोबर परदेशी शिक्षणास जाण्याची संधी मिळाली होती. पण देश अडचणीत होता. तरुण रक्त स्वस्थ बसू देत नव्हते आणि म्हणून या स्वातंत्र्यसंग्रामात उतरलो. 15 शाळा रयत शिक्षण संस्थेस जोडल्या."[5] असे बापूजींनी प्रा.स.ग.यादव यांनी घेतलेल्या मुलाखतीप्रसंगी प्रतिपादन केले आहे. यावरून बापूजींचा शिक्षणाचा ध्यास, शिक्षकाचा पिंड, त्याग, त्यांची राष्ट्र  क्ती व देशकार्याची कल्पना येते.

गांधीजींच्या राष्ट्र  क्तीने, राष्ट्रीय विचारसरणीने  ारावलेल्या बापूजी साळुंखे यांच्या स्वप्नात गांधीजी आले अन् 'गांधीजींची मुरली' ही कविता साकार झाली. याच वर्षी झालेल्या 'चले जाव' आंदोलनात बापूजींनी उत्फूर्तपणे कार्य केले. "1942 ला संपूर्ण सातारा पेटून निघाला होता. क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद  ारती, आ. वसंतरावदादा पाटील, अच्युतराव पटवर्धन, पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड यांच्याबरोबर आम्ही त्यात उतरलो."6 असे बापूजींनी म्हटले आहे.

12,13 मे 1945 रोजी सातारा जिल्हा काँग्रेस पहिली परिषद कराड तालुक्यात कापील येथे संपन्न झाली. याप्रसंगी सानेगुरुजींच्या प्रमुख उपस्थितीत कर्मवीर  ाऊराव पाटील यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 1 लाख रुपयांचा गौरवनिधी संकलित करण्याचा ठराव घेण्यात आला. गौरवनिधीचे अध्यक्ष म्हणून बापूजींची निवड केली गेली. बापूजींनी पुष्कळ  मंती करून, परिश्रम घेऊन हा गौरवनिधी संकलित करण्यात मोलाची  ूमिका बजावली. सातारा जिल्हा विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची याच वर्षी निवड झाली. बी.ए. ची परीक्षा याच वर्षी ते उत्तीर्ण झाले. 22,23 ऑक्टोबर 1946 रोजी कोंडवे येथे सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेस परिषद घेण्यासाठी बापूजींनी पुढाकार घेतला, व ही परिषद त्यांच्या उत्तम संयोजनाखाली यशस्वीपणे पार पडली. पुढील शिक्षणक्षेत्रातील ध्यासपर्वासाठी हा अनु  व बापूजींना पोषक व उपकारक ठरला. कर्मवीर गौरवनिधी अर्पण समारं ासाठी महात्मा गांधीजींना निमंत्रित करण्यासाठी बापूजी दिल्लीला गेले. गांधीजींनी आस्थापूर्वक स्वागत केले व या समारं ासाठी शु ेच्छा व्यक्त करून संदेश दिला. दोन बापूजींची ही भेट परस्परांना प्रभावित करून गेली. गांधीजींचा बापूजींना झालेला स्पर्श बापूजींसाठी परीसस्पर्श ठरला. तेजोमय व्यक्तिमत्त्वाच्या प्रकाशाने बापूजी आणखी झळाळून निघाले. पुढील कार्याची दिशा खुणावत गेली. 27 नोव्हेंबर 1948 रोजी कर्मवीर गौरवनिधी अर्पण समारं  संपन्न झाला. तो उपस्थितांना प्रेरणा देणारा ठरला. यात बापूजींची  ूमिका व परिश्रम महत्त्वपूर्ण ठरले.

कर्मवीरांनी बापूजींचे व्यक्तिमत्त्व जवळून पाहिले होते. कर्मवीरांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेत सातारा येथील सयाजीराव हायस्कूलमध्ये बापूजी 1948 साली शिक्षक म्हणून रुजू झाले. उगवत्या पिढीला शिकवितानाचा, घडविण्याचा शिक्षणानंद बापूजींना बरेच काही सांगून गेला. 1949 साली रयत शिक्षण संस्थेअंतर्गत रुकडी येथे महात्मा गांधी विद्यालयाची स्थापना झाली. या विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक म्हणून संस्थाचालकांनी बापूजींना नियुक्त केले. एक मुख्याध्यापक कसा असावा याचा वस्तुपाठ बापूजींनी आपल्या कार्यातून उ ा केला. अल्पावधीतच ही शाळा त्यांनी प्रगतिपथावर नेली. विद्यालयाची इमारत उ ी केली. सामूहिक श्रमदानातून दोन विहिरी खणून 25–30 एकर जमीन लागवडीखाली आणली. दहावीचा निकालही उत्तम लागला. महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर शासनाने रयत शिक्षण

संस्थेची ग्रँट बंद केली. मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी साताऱ्याच्या स `त कर्मवीरांवर टीका केली. तेव्हा बापूजी व दि. रा. माने यांनी त्यांची गाडी अडविली व त्यांच्या चुकीची त्यांना जाणीव करून दिली. परिणामी काही महिन्यांनी रयत शिक्षण संस्थेची ग्रँट सुरू झाली.

शिक्षणाविषयीची अपार आस्था, जनसामान्यांच्या उद्धाराची आंतरिक तळमळ व अमाप ऊर्जा बापूजींना स्वस्थ बसू देत नव्हती. पुढील बृहत्कार्याची क्षितिजे त्यांना खुणावत होती. आपणही कर्मवीरांप्रमाणे एखादी शिक्षणसंस्था उ ी करावी, या जाणिवेतून त्यांनी 19 ऑक्टोबर 1954 रोजी कराड येथील मुरलीधर मंदिरात एक बैठक बोलावली. बैठकीतील उपस्थितांचा प्रतिसाद पाहून 1 नोव्हेंबर रोजी रयत शिक्षण संस्थेस त्यांनी राजीनाम्याची पूर्वसूचना दिली व याच दिवशी 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' असे संस्थेचे नामकरणही केले.

"स्वतःवर प्रचंड विश्वास असू द्या."[7]

"प्रत्यक्ष कार्य सुरू केले म्हणजे मदत मिळतेच असे ज्यांना वाटते त्यांच्याच हातून कार्य होत असते."[8]

"जा, अस्पृश्यांकडे जा, त्यांना सांगा, तुमच्यातही आत्मा आहे. सर्व जगात क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य आपल्यात आहे, ही जाणीव त्यांच्यात निर्माण करा. त्यांच्यात जाऊन शाळा स्थापन करा. त्यांना शिक्षण द्या."[9]

"आम जनतेत शिक्षणप्रसाराला आता तुम्ही सुरुवात करा. त्यांना पटवून द्या, की तुम्ही आमचे ाईबंद आहा. अगदी आमच्याच रक्तामांसाचे आहा. अशा प्रकारची सहानु ूती तुमच्याकडून त्यांना मिळाली तर कार्य करण्याचा त्यांचा उत्साह सहस्रपट वाढेल."[10]

स्वामी विवेकानंदांचे हे व असे विचार बापूजींना प्र ावित करून गेले होते. या विचारांच्या ध्यासातूनच त्यांनी शिक्षणसंस्था स्थापन केली हेती व जाणीवपूर्वक स्वामी विवेकानंदांचे नावही शिक्षणसंस्थेला दिले होते. बापूजींनी 1 डिसेंबर रोजी संस्थेची रीतसर नोंदणी केली. 31 मे 1955 रोजी रयत शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक पदाचा राजीनामा दिला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची आदर्शवत ठरावी अशी घटना बापूजींनी स्वतः लिहून वाढली. 'ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार यासाठीच शिक्षणप्रसार' हे संस्थेचे काळानुरूप व निरंतर बोधप्रद प्रेरणादायी ठरले असे ब्रीदवाक्य ठेवले, आणि संस्थेच्या प्रार्थनेची त्यांनी रचना केली. संस्थेचे ब्रीदवाक्य हे व्यक्तीविकास, समाजविकास व राष्ट्रविकासाची एक महत्त्वपूर्व त्रिसूत्री ठरावी असेच आहे.

6 जून 1955 रोजी बापूजींनी संस्थेअंतर्गत शाखा उघडली, संस्कृतीकेंद्र उ ारले. वाई येथे बहुजन समाजासाठी हायस्कूलची असलेली गरज लक्षात घेऊन 1956 साली महर्षी शिंदे विद्यामंदिराची स्थापना केली. या विद्यामंदिराचे उद्‌घाटन यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची वाईत हायस्कूल स्थापन्याची अपूर्ण राहिलेली इच्छा बापूजींनी पूर्ण केली व कृतज्ञतापूर्वक त्यांचे नावही या विद्यामंदिरास दिले.

बापूजी समतावादी व मानवतावादी होते. कुठलाच `द ाव त्यांना मान्य नव्हता.

> जिकडे जावे तिकडे माझी ावंडे आहेत.
> सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत.

केशवसुतांच्या या काव्यपंक्तीतील आशयाचे मूर्तिमंत दर्शन म्हणजे बापूजींचे जीवन. त्यामुळे बापूजींना आपल्या कार्यात उत्स्फूर्त लोकसह ाग मिळाला. संस्थेचा विस्तार व नावलौकिक उत्तरोत्तर वाढत गेला. 20 जून 1959 रोजी मराठवाड्याात उस्मानाबाद येथे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पहिले महाविद्यालय बापूजींनी स्थापन केले. त्यामुळे एकेकाळी निजामी राजवटीत असलेल्या उस्मानाबाद व नजीकच्या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली. "कोंडलेल्या जाणिवांचा पक्षी ज्यातून मुक्त होतो तेच खरे शिक्षण. त्यासाठी व्यथेची आच असणारे शिक्षक हवेत."[11] असा बाबा आमटे यांनी आम्हां शिक्षकांना मुलाखतीप्रसंगी संदेश दिला. या संदेशातील आशय जणू स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था अनु वीत होती.

बापूजी विद्यार्थ्यांची आस्थापूर्वक विचारपूस करीत. त्यांच्या अडचणी, समस्या जाणून घेत. त्यावर उपाययोजना करीत. विद्यार्थ्यांत रममाण झालेले बापूजी पाहताना अनेकांना सानेगुरुजींची आठवण होई. आपले वाटणाऱ्या बापूजींचा 42 वा वाढदिवस विद्यार्थ्यांनी आपुलकीने व मोठ्याा उत्साहात साजरा केला. ज्यांच्यासाठी हा ज्ञानयज्ञ आरं ला, त्यांच्या अंतःकरणाने बापूजींना कृतज्ञतापूर्वक केलेले हे अ िवादन होते.

1964 हे स्वामी विवेकानंदांचे जन्मशताब्दी वर्ष बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विविध वि ागांत नानाविध रचनात्मक कार्यक्रमांतून व प्रेरक उपक्रमांतून साजरे केले. स्वामी विवेकानंदांच्या विचारांप्रमाणे संस्कारसंपन्न विद्यार्थी, तेजस्वी युवक घडविणारी ही संस्था या वर्षी 'विवेकानंदमय' झाली होती. पुढील ऊर्जस्वल कार्यासाठी सामूहिक मन गतिमान झाले होते. याच वर्षी बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची स्थापना केली. संस्थेअंतर्गत विविध वि ाग उघडताना बापूजींनी तिथे नियुक्त करावयाच्या शिक्षकांच्या गुणवत्तेला व नीतिमत्तेला प्राधान्य दिले, कारण त्यांच्या हातून निपजणारी पिढी ही राष्ट्राची खऱ्या अर्थाने मालमत्ता होती. या जाणिवेतूनच त्यांचे कार्य घडत

राहिले. साध्या इमारतीतही अध्ययन व अध्यापन होऊ शकते, असे ते म्हणत. म्हणून त्यांनी व्य, शो ायमान व दिखाऊ इमारती उ ारण्यास महत्त्व दिले नाही. बापूजींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्यशैलीचा प्र ाव सर्वदूर पोहोचला होता. बापूजी आपल्या गावात, ागात विद्यालय, महाविद्यालय स्थापन करीत आहेत, याचा मनस्वी आनंद गावकऱ्यांना होत होता व त्यामुळे संस्थेला त्यांचे अनेक दृष्टीने सहकार्यही ला त गेले. प्रारं ी स्थानिक लोकांमध्ये जाणीवजागृती करावी लागली. या संदर्भात त्या काळाचे साक्षीदार असलेल्या व बापूजींचे सहकारी राहिलेल्या रा.ना.चव्हाण यांनी 'ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षणपरंपरा कर्मवीर ाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापूजी साळूंखे' या ग्रंथात नोंदविले आहेः

"संस्थेचा विस्तार करीत असताना ते स्वतः व त्यांचे कार्यकर्ते ज्या ठिकाणी केंद्र उ ारता येणे शक्य आहे त्या गावी जाऊनही त्यांनी कित्येक केंद्रे उ ी केली. तेथील स्थानिकांना कल्पनाही नव्हती. लोकांच्या आमंत्रणाचीही वाट त्यांनी बहुतेक ठिकाणी पाहिली नाही. स्थानिकांना संघटित होऊन, केंद्र स्वतः उ ारण्याची शक्ती नव्हती. त्यांना जागृत करून, उठवून, एक करून अनेक ठिकाणी केंद्राचे खुंट लाविले, रोविले. हे केळीचे खुंट प्रथम पाने व फळे (केळीचे घड) न आलेल्या स्थितीत होते. प्रथम ते शो ा देत नव्हते. आता बहरले आहेत. अर्थात अनेकांनी त्यांना पाणी घातले, रोखले, वाढविले. बापूजींची पहिली विवेकानंद संस्थेतील पाच–दहा वर्षे वरील स्वरूपात कार्य करण्यात गेली."[12] यावरून तत्कालीन परिस्थितीची, बापूजींनी व सहकाऱ्यांनी तळमळीने केलेल्या कार्याची, लोकसह ागाची कल्पना येते.

बापूजींना शैक्षणिक कार्यात काही मान्यवरांचे शासनाचे मोलाचे वेळोवेळी साह्या झाले. स्थानिक देणगीदार, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, मंत्री इत्यादींनी बापूजींच्या कार्यात सहकार्य केले. बापूजी आजारी असताना पुढे सातारा मध्यवर्ती बँकेच्या स ागृहात त्यांना मानपत्र देण्यात आले. यावेळी पाहुणे मा.यशवंतराव होते. संस्था व बापूजी यांच्यासंबंधी त्यांनी अनेक आठवणी सांगितल्या. कुलगुरू आप्पासाहेब पवार यांच्या सांगण्यावरून विवेकानंद शिक्षण संस्थेचे बापूजी साळुंखे हे सरकारकडे पडून राहिलेली लाखो रुपयांची रक्कम शाळांच्या इमारती बांधण्याकडे वेळेवर खर्च करू शकतील, अशी शिफारस चव्हाणांकडून प्राप्त होताच इमारत निधी विवेकानंद शिक्षण संस्थेस 1961 साली प्राप्त झाला. याच निधीतून महर्षी शिंदे हायस्कूलची इमारत बापूजींनी उ ी केली."[13] यावरून बापूजींच्या कार्याविषयीची आस्था, विश्वास, अप्पासाहेब पवार, यशवंतराव चव्हाण यांचे संस्थेला झालेले मोलाचे साह्य लक्षात येते.

बापूजींची कार्यशैली विलक्षण प्र ावी होती. उद्या, आठवड्याात, महिन्यात, वर्षात करावयाच्या कामाचे त्यांचे नियोजन ठरलेले असे. संस्थेच्या महाराष्ट्र र कार्यरत असलेल्या सर्व वि ागांत सुसूत्रता यावी, कल्पक उपक्रमांची, विचारांची देवाणघेवाण व्हावी, संपर्कातून समृद्धीकडे शिक्षणप्रवास, जीवनप्रवास घडत राहावा, या व्यापक जाणिवेतून बापूजींनी प्रत्येक जिल्हानिहाय वि ागीय स ा घेण्याची पद्धत प्रारं केली. या स`ला जिल्ह्यातील संस्थेच्या विद्यालयाचे मुख्याध्यापक, महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे प्रशासक, आजीव सदस्य, शिक्षणप्रेमी, हितचिंतक इत्यादींची उपस्थिती असल्यामुळे व मनमोकळेपणे खुली चर्चा, वैचारिक आदानप्रदान घडत गेल्यामुळे संपर्कातून समृद्धीकडे असा प्रवास घडत गेला.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचा आता वटवृक्ष झाला आहे. या संस्थेचे गुणात्मक, मूल्यात्मक वैभव हे बापूजींच्या अखंड परिश्रमातून, अपार त्यागातून व विशुद्ध चारित्र्यातून साकार झाले आहे. 171 माध्यमिक विद्यालये, 69 ज्युनिअर कॉलेजेस, 21 महाविद्यालये, 4 टेक्निकल, 12किमान कौशल्य, 8 शिक्षणशास्त्र विद्यालये, 12 प्राथमिक विद्यालये, 11 पूर्व प्राथमिक विद्यालये, 26 बालवाडी व इतर, 3 इंग्रजी माध्यमिक शाळा,7 पदव्युत्तर शैक्षणिक केंद्र, 5 शेती विभाग, 20 वसतिगृह, 1 डी. फार्मसी, 1 अभियांत्रिकी पदविका, 1 नर्सिंग कॉलेज, अशा संस्थेअंतर्गत एकूण 372 शाखा कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेपाठोपाठच या संस्थेचे नाव देशभर आदरपूर्वक घेतले जाते. या संस्थेचे शेकडो विद्यार्थी देशात व परदेशात विविध क्षेत्रांत लक्षणीय कार्य करीत आले आहेत. माहेरची ओढ जशी एखाद्या स्त्रीला लागावी, तशी ओढ या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांना लागते. संस्थेविशयी कृतज्ञता व्यक्त करताना त्यांना मनोमन धन्यता वाटते.

बापूजींना संस्थेतील व बाहेरील काही अपप्रवृत्तींचा शेवटच्या कालखंडात अतिशय त्रास सहन करावा लागला. काही वाईट, अकल्पित घटना–प्रसंगांना त्यांना सामोरे जावे लागले, तरी बापूजींनी आपली निष्ठा ढळू दिली नाही. परंतु अशा घटना–प्रसंगांचा बापूजींच्या स्वास्थ्यावर बिकट परिणाम होत गेला. 22 जानेवारी 1973 रोजी बापूजींचा 'गुरुदक्षिणा' अर्पण समारंभ झाला. यात बापूजींवरील गौरव अंकाचेही प्रकाशन झाले. आपल्या गुरुविशयीची कृतज्ञता व्यक्त करणारा हा समारंभ अशाच अन्य समारंभांना प्रेरणा देणारा ठरला, तसाच गौरव अंकही ! बापूजींच्या शष्ट्याब्दीपूर्तीनिमित्त संस्थेचे अध्यक्ष वसंतदादा पाटील यांच्या हस्ते 5 लाख रुपयांची थैली अर्पण करून यथोचित गौरव करण्यात आला. तासगाव नगर परिषद, करवीर नगरवासीय, जोहे, सातारा जिल्हा यांच्या वतीने बापूजींचा सत्कार करण्यात आला 1985 साली महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'दलितमित्र' हा किताब देऊन बापूजींना गौरविण्यात आले. 11 फेब्रुवारी 1986 रोजी शिवाजी विद्यापीठाने बापूजींना डी.लिट. पदवी देऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान केला.

### *बापूजींचा स्वभाव व व्यक्तिमत्त्व :*

बापूजींचे व्यक्तिमत्त्व लोभस होते. बापूजी मानवतावादी, गांधीवादी होते. त्यांची राहणी साधी होती. ते खादीचे कपडे वापरत. बापूजी एखादे कार्य व्हावेच यासाठी आग्रह धरीत. काहींना तो हट्ट वाटे. परंतु, खरे तर तो सत्याचा आग्रह म्हणजे 'सत्याग्रह' असे. बापूजी प्रसंगी उपोशणाच्या मार्गाचा अवलंब करीत. बापूजी लोकशाहीवादी होते. व्यक्तीपेक्षा

संस्था मोठी व संस्थेपेक्षा लोक मोठे असे ते मानत. विरोधकांचे म्हणणे ते ऐकून घेत. आवश्यक असेल तिथे उत्तरे देत. बापूजी हजरजबाबी होते. बापूजींची स्मरणशक्ती तल्लख होती. कोणताही संदर्भ ते तत्काळ व अचूक सांगू शकत असत. योग्य त्या माणसांची आवश्यक, उचित अशा ठिकाणी ते नियुक्ती करीत. माणसांची उत्तम पारख करणारे एका अर्थाने ते रत्नपारखी होते.

बापूजींचे मन संवेदनशील व तितकेच कणखरही होते. अंगी निर्भयता, धैर्यशीलता वास करीत होती. "बापूजींच्या स्वभावात जातीयता–धर्मभेद व जुनाट अस्पृश्यता यांच्यासंबंधी लवलेश आढळला नाही. फार काय मराठ्यांचा अभिमान (अहंकार) त्यांच्यात आढळला नाही."[14] बापूजींची वृत्ती प्रतिक्रियावादी नसून रचनात्मक व विधायक कार्य विस्तारवादी होती. कोणाशी मतभेद झाले तर स्वतंत्रपणे आपले पुढील कार्य करण्यात त्यांना रस वाटे. काही वाईट अनुभव आले तरी गुरफटून जाण्यापेक्षा पुढील कार्याकडे त्यांचे सदोदित लक्ष लागलेले असे. रस्त्याने जाणारा कोणी साधासुधा माणूस जरी दिसला तरी बापूजी त्याला आपल्या गाडीत घेत व त्याला जिथे जायचे तिथे सोडत असत. संस्थेची गाडी कुटुंबीयासाठी त्यांनी कधी वापरली नाही.

संस्थेतील कोणी कर्मचारी चुकला तर, बापूजी त्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देऊन सुधारण्याची संधी देत. सर्व राजकीय पक्षांच्या लोकांशी त्यांचा परिचय होता. परंतु ते शेवटपर्यंत कोणत्याच विशिष्ट राजकीय पक्षाचे नव्हते. यातच सर्व काही आले. बापूजी निश्कांचन वृत्तीचे कर्मयोगी होते. आयुष्यभर त्यांनी तन–मन–धनाने संस्थेची सेवा केली. "बापूजी जास्तीत जास्तपणे संघर्शवादी होते, पण प्रसंग पाहून तडजोडीदेखील करीत."[15] कारण परिस्थिती निवळून पुढील कार्य घडावे असे त्यांना वाटे. आपल्या संस्थेच्या कार्यविस्तारात, यशात अनेकांचे परिश्रम मोलाचे ठरले आहेत, ही जाणीव त्यांनी उराशी बाळगली होती. "संस्थेने आजपर्यंत ज्या विशिष्ट ध्येयाने व दिव्याने शिक्षणाची जी कामगिरी केली आहे, त्यामध्ये सर्व कार्यकर्त्यांचे कष्ट कारणीभूत आहेत. त्याशिवाय संस्थेच्या जबाबदार कार्यकर्त्यांनी, संस्थापकांनी व आजीव सेवकांनी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात त्यागाची महान परंपरा निर्माण केली आहे."[16] असे बापूजींनी 1967 साली एका प्रसंगी म्हटले आहे. संस्थेच्या विकासात ज्या घटकांचा मोलाचा वाटा आहे, त्यांचा जाहीर गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या योगदानाबद्दल आदरभाव व्यक्त करण्याचा मोठेपणा त्यांच्या ठायी होता.

बापूजींनी आयुष्यभर कर्तव्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा, प्रामाणिकपणा, सेवाभाव, शिस्त, परोपकार, सामाजिक बांधिलकी, समता, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवता, चारित्र्य इत्यादी नीतिमूल्यांची कसोशीने जोपासना केली. आपल्या तपःपूत जीवनकार्यातून शिक्षणाचे एक ध्यासपर्व त्यांनी उभे केले, जे आदर्शवत व पिढ्यान्पिढ्या प्रेरणादायी ठरत राहणार आहे.

### *बापूजींची भाषा व लेखन :*

बापूजींचे बोलणे लाघवी व प्रभावी होते. ते उत्तम वक्तेही होते. साधे बैठकीतील बोलणे असो वा विचारमंचावरील भाषण, ऐकणाऱ्यांचे कान व मनही त्यांच्याकडेच लागलेले असे. बापूजींच्या भाषेत प्रगल्भता, सौष्ठव व मार्दव होते. त्यांच्या बोलण्यात मुद्देसूदपणा, स्पष्ट भूमिका, आवाहनक्षमता व परिणामकारकता होती. बापूजींचे लेखनही तसेच होते याची जाणीव, त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची तयार केलेली घटना असेल वा वेळोवेळी लिहिलेली पत्रके, निवेदने व अहवाल असतील यावरून येते. "त्यांनी काढलेले 'संस्कृती' नियतकालिकाचे अंक पाहता त्यांनी शिक्षणधर्म विकसित केलेला आढळतो. शिक्षणसंस्था कशी असावी, कशी नसावी हे त्यांनी 1967–68 च्या संस्कृती अंकात दिले आहे. तत्त्वज्ञान विषद करताना त्यांची प्रौढभाशा व्यक्त झाली आहे."[17] याशिवाय बापूजींच्या लेखनाचा एक उत्तम नमुना म्हणून, रा.ना. चव्हाण व डी.एल. पाटील यांनी महर्षी शिंदे यांच्या आठवणीपर संपादित केलेल्या पुस्तकातील बापूजींनी 'दलितांचे महर्षी' या नावाने लिहिलेल्या लेखाचा उल्लेख करता येईल.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत मोलाचे योगदान देणारे दाजी यांचे निधन झाल्याचे बापूजींना कळले. तेव्हा बाबूराव यांना लिहिलेल्या पत्रात बापूजींनी आपली भावना व्यक्त केली आहे : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमार्फत वाईत महर्षि शिंदे विद्यामंदिर सुरू केल्यापासून तीर्थस्वरूप कै. दाजींचा संबंध आला. कै.दाजी त्या हायस्कूलचे एक जनकच आहेत. त्या हायस्कूलच्या कामी दाजींनी सुरुवातीपासून त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत मोठ्या आपुलकीने लक्ष घातले होते. त्या हायस्कूलच्या कामीच लक्ष घातले होते असे नव्हे तर स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्य वाई तालुक्यात जे वाढत आहे त्यासाठी सुद्धा त्यांनी आपल्या अगदी उतारवयातही परिश्रम आणि अंतःकरणाचा आपलेपणा दाखविला. ब्राह्मो समाजाच्या मंदिरातील महर्षि दाजींच्या जीवनाची ज्योत मालवली. प्रार्थना मंदिराच्या खोलीत सतत सत्कार्याचे चिंतन करणारे महर्षि दाजींची आता मला पुनः भेट होणार नाही. सर्व वाई तूर्त आम्हांला शून्य वाटणार."[18] यावरून बापूजींच्या भाषाशैलीची व लेखनशैलीची कल्पना येते, तसेच सहकाऱ्याविषयी असलेली आत्मीयता, कृतज्ञताभाव दिसून येतो.

### *प्रेरणादायी विचार :*

बापूजींनी वेळोवेळी आपल्या भाषणातून, बैठकीतून लेखनातून आपले विचार मांडले आहेत. त्या विचारांचा

अभ्यास केला असता त्यांच्यातील कृतिशील विचारवंत आपणांस प्रभावित करून जातो.

शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना बापूजी म्हणतातः "सद्वर्तनी, सुसंस्कारी, शीलसंपन्न समाज निर्माण व्हावयाचा असेल तर शिक्षणाची कास पकडावी लागेल."[19]

केवळ शिक्षणाची कास धरून भागणार नाही. त्यासोबतच शिक्षणक्षेत्रात येणारे शिक्षक हे कसे असावेत, याबाबत बापूजी म्हणतातः "ज्ञान, संशोधन करणारे, सत्याची उपासना करणारे संस्कारशील शिक्षक मला हवेत."[20]

शिक्षकासोबतच विद्यार्थी हा महत्त्वाचा घटक. सध्या विद्यार्थीकेंद्रित शिक्षण दिले गेले पाहिजे, यावर भर दिला जात आहे. विद्यार्थीजीवनातील श्रद्धास्थानांचे महत्त्व याबाबत बापूजींनी एका भाषणप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले आहेः "आपला मार्ग नीट चोखाळता यावा, निश्चित स्वरूपाची ध्येयसिद्धी प्राप्त व्हावी यासाठी एखादे आदर्श श्रद्धास्थान त्यांनी आपल्यासमोर सतत ठेवावे असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. श्रद्धेने पर्वत हालतात. सतत भेडसावणारे अनेक प्रश्न सुटू लागतात. चित्ताला शांती मिळते, म्हणून विद्यार्थ्यांनी श्रद्धास्थान उन्मुख व्हायला हवे."[21]

शिक्षकाचे अध्यापन कसे असावे व विद्यार्थ्याने अध्ययन कसे करावे याबाबचे अनुभवाचे बोल बापूजींनी सांगितले आहेत : "शिक्षण पवित्र आहे. ते पावित्र्याने दिले व घेतले पाहिजे. लीनता, चौकसपणा आणि सेवा या मार्गाने ज्ञानार्जन करावे."[22]

'सत्ता–संपत्ती–सुंदरी' यांच्या जाळ्यात अडकू नका, असे बापूजी म्हणत. बापूजींनी याशिवाय सकळांना जीवन जगताना उपकारक ठरतील असे काही विचारही प्रतिपादित केले आहेत :

"संस्कृतिसंपन्न समाज हा मानवतेचा खरा आधार, अडचणी सावलीसारख्याच कार्याबरोबर येत असतात म्हणून नाउमेद होऊ नये. बोललो तसे वागलो नाही तर परमेश्वरापाशी आपण बेईमानाने वागलो असं होईल. विचार, उच्चार आणि आचार यांची शुद्धता राखा."[23]

याप्रमाणे बापूजींचे कृतिशील विचार, अनुभवाचे बोल शिक्षणक्षेत्रातील शिक्षक, विद्यार्थी इत्यादी घटकांना मार्गदर्शक, प्रेरणादायी व उपकारक ठरत आले आहेत व पुढेही राहतील असे प्रकर्शाने वाटते.

### *बापूजींच्या कार्याचे महत्त्व :*

सृष्टीरूपी रंगमंचावरील जीवनरूपी नाटकातील आपण विविध पात्रे आहोत. यातील प्रत्येकाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. यातील नायकाच्या भूमिकेला तर अनन्यसाधारण महत्त्व असते. बापूजी साळुंखे यांच्या कार्याचेही असेच अनन्यसाधारण महत्त्व आहे. बापूजींनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून केलेले कार्य असेल वा या संस्थेची बंद पडलेली ग्रॅंट पुन्हा सुरू व्हावी म्हणून केलेले प्रयत्न असतील ते उपकारक व महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

कर्मवीरांनी पाचगणी येथे काढलेले हायस्कूल बंद पडले, बापूजींनी पुन्हा तेथे हायस्कूल उघडले. याप्रमाणे या दोहोंचे शैक्षणिक प्रयत्न एकमेकांना पूरक ठरत गेले व त्या त्या भागातील शिक्षणाची गैरसोय दूर होत गेली. "विवेकानंद शिक्षण संस्था व त्यापूर्वीची रयत शिक्षण संस्था यांनी प्रथम ग्रामीण भागात जाऊन शिक्षणप्रसाराचा पायंडा पाडला, हे मान्य करावे लागते."[24]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रभर विखुरलेल्या गोरगरिबांच्या, जनसामान्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी कवेत घेणाऱ्या काही मोजक्या शिक्षणसंस्था होत्या. त्यात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने भरीव कार्य केले. ग्रामीण भागातील मागास जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी पदविका, नर्सिंग, कृषी, डी.फार्मसी व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय या संस्थेने उपलब्ध करून दिली व लाखो विद्यार्थ्यांचे जीवन घडविले. बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली नसती तर बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित राहिला असता.

एखाद्या शिक्षकाने एखाद्या मोठ्या संस्थेतून बाहेर पडावे व तितक्याच तोलामोलाची संस्था अवघ्या 20–25 वर्षांत समर्थपणे उभी करावी, ही निश्चितच अतुलनीय व अपूर्व अशी बाब आहे. बापूजींचे शिक्षणक्षेत्रातील भरीव, रचनात्मक कार्य महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिले जावे एवढे मोलाचे आहे. 'झाले बहु, होतील बहु आहेतही बहु, परंतु यासम हा' असेच बापूजींविषयी म्हणावेसे वाटते.

बापूजींचे सहकारी राहिलेल्या रा.ना.चव्हाण यांनी बापूजींच्या कार्याचे मोल विषद करताना म्हटले आहेः "शुचिता, शुद्धता, पिळवणुकीचा अभाव, कोणासही जमाखर्च पाहण्याची मुभा वगैरे आगळेवेगळे मुद्दे त्यांनी शिक्षणप्रसारात समावेशित करून प्रचारिले. यामुळे पूर्वीच्या स्वावलंबनातही मुद्दाम भरच पडली."[25] याबरोबरच कर्तव्यनिष्ठा, समूहभावना, सांघिक ऐक्य, समानता, कार्यसंस्कृती, प्रामाणिकपणा, समर्पण इत्यादी मूल्यांची जोपासना करण्याचा एक वस्तुपाठ या संस्थेने उभा केला आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी बापूजींचा गौरव करताना म्हटले आहे :

"बहुत जनासी चालवी। नाना मंडळे हालवी।।
ऐसी ही समर्थ पदवी। भूलोकी।।"[26]

तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बापूजींच्या कार्याविषयी आदरभाव व्यक्त करताना म्हटले आहे : "Look at his industry & perseverance! one man's toiling hard and has achieved a good result."[27]

यावरून बापूजींच्या कार्याचे महत्त्व दिसून येते. तसेच मान्यवरांच्या, थोरांच्या गौरवपूर्ण अभिप्रायावरून बापूजींच्या कार्याचे मोल ज्ञात होते.

बापूजींचे 8 ऑगस्ट 1987 रोजी देहावसान झाले. एक ध्यासपर्व संपले. हे ध्यासपर्व चालविण्याची जबाबदारी बापूजींचे सुपूत्र मा.अभयकुमारजी साळुंखे (कार्याध्यक्ष), मा.गृहमंत्री आर.आर.पाटील (अध्यक्ष) बापूजींची सुकन्या मा. शुभांगी गावडे (सचिव), इत्यादी संस्थाचालक निष्ठापूर्वक व समर्थपणे पार पाडीत आहेत. बापूजींच्या जीवनकार्याचा प्रकाश असाच जनसामान्यांच्या जीवनात तेजाळत राहणार आहे.

### *समारोप :*

ध्येयवादी माणसेच इतिहास घडवितात. समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी आपले आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवीत राहतात आणि हजारो, लाखो व्यक्तींच्या जीवनाचा उद्धार करीत राहतात. बापूजी साळुंखे हे असेच एक अतुलनीय व्यक्तिमत्त्व. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या उन्नयनासाठी रयत शिक्षण संस्था व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बापूजींनी काळाची गरज असलेले रचनात्मक व भरीव असे कार्य केले. लाखोंच्या जीवनाला प्रकाशाची वाट दाखविणारा हा प्रकाशयात्री श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रूपाने दीपस्तंभासमान मार्गदर्शक ठरत राहणार आहे.

"आनंद या जीवनाचा सुगंधापरी दरवळावा
पाव्यातला सूर जैसा ओठातुनी ओघळावा
झिजुनी स्वतः चंदनाने दुसऱ्यास मधुगंध द्यावा
हे जाणता जीवनाचा प्रारंभ हा ओळखावा"[28]

### *निष्कर्ष :*

1.देशाच्या स्वातंत्र्यलढ्याात बापूजी साळुंखे यांनी मोलाचे योगदान दिले असून त्यांच्यावर गांधीवादी, राष्ट्रीय विचारसरणीचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.
2.बापूजी साळुंखे यांनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षक व मुख्याध्यापक यांनी कसे कार्य करावे याचा एक वस्तुपाठ उभा केला असून या संस्थेची बंद पडलेली ग्रॅंट सुरु करण्यात त्यांचे प्रयत्न उपकारक ठरले आहेत.
3.स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतरतेच्या, ध्येयनिष्ठेच्या प्रेरणा जिवंत ठेवाव्यात, स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय व्हावी, या भूमिकेतून बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली आहे.
4.स्वामी विवेकानंद यांचे शिक्षणविषयक व जीवनविषयक विचार बापूजींना शिक्षणसंस्था स्थापन करण्यासाठी प्रेरणादायी ठरले असून त्यांनी जाणीवपूर्वक स्वामी विवेकानंदांचे नाव या शिक्षणसंस्थेस दिल्याचे दिसून येते.
5.'ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार यासाठीच शिक्षणप्रसार' हे या ब्रीदवाक्याप्रमाणेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा कार्यविस्तार घडला असून या संस्थेने महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची उत्तम सोय करून त्यांच्यात ज्ञाननिष्ठा, वैज्ञानिक जाणीव व सुसंस्कार प्रभावीपणे रुजविले आहेत.
6.श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे गुणात्मक व मूल्यात्मक वैभव हे बापूजींच्या अखंड परिश्रमातून, अपार त्यागातून व विशुदध चारित्र्यातून साकार झाले आहे.
7.बापूजींचे व्यक्तिमत्त्व लोभस असून त्यांचे भाषण व लेखन मुद्देसूद, आशयगर्भ व प्रभावशाली असल्याचे दिसून येते.
8.बापूजींनी आयुष्यभर कर्तव्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा, प्रामाणिकपणा, सेवाभाव, शिस्त, परोपकार, सामाजिक बांधिलकी, मानवता, चारित्र्य इत्यादी नीतिमूल्यांची कसोशीने जोपासना केल्याचे दिसून येते.
9.बापूजींच्या शिक्षणविषयक व जीवनविषयक विचारांना अनुभूतीचे अधिष्ठान असून त्यांचे विचार अनेकांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले आहेत.
10.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात रचनात्मक, भरीव व मौलिक स्वरूपाचे कार्य केले असून सध्याचे संस्थाचालक संस्थेचा वारसा समर्थपणे सांभाळत आहेत.

### *संदर्भसूची :*

1) चव्हाण रा.ना.,ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षणपरंपरा–कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापूजी साळुंखे,रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान (अक्षर पुष्पांजली पुष्पः22), पुणे–2,प्रथम आवृत्ती,एप्रिल 2012,पृ.क.सात,आठ.

2) सा.रामप्रताप, दि.08.08.2011, पृ.क.3.
3) चव्हाण रा.ना.,ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षणपरंपरा–कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापूजी साळुंखे, रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान (अक्षर पुष्पांजली पुष्पः22), पुणे–2,प्रथम आवृत्ती,एप्रिल 2012,पृ.क.एकोणतीस.
4)तत्रैव, पृ.क.248.
5)यादव स.ग.यांनी बापूजी साळुंखे यांची घेतलेली मुलाखत.
6)तत्रैव.
7) जोशी शारदा, स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरित्र व विचारधन, विद्याभारती प्रकाशन,लातूर, पृ.क.40.
8) तत्रैव, पृ.क. 10,11.
9) तत्रैव, पृ.क. 24.
10) तत्रैव, पृ.क. 44.
11) बाबा आमटे यांची राऊत कमलाकर यांनी घेतलेली मुलाखत, आनंदवन, ता. वरोरा, जि.चंद्रपूर.दि.23 ऑक्टोबर 1998.
12) चव्हाण रा.ना.,ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षणपरंपरा–कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापूजी साळुंखे, रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान (अक्षर पुष्पांजली पुष्पः22), पुणे–2,प्रथम आवृत्ती,एप्रिल 2012,पृ.क.200.
13) तत्रैव, पृ.क. 211.
14) तत्रैव, पृ.क. 204.
15) तत्रैव, पृ.क. 243.
16) तत्रैव, पृ.क. 207.
17) तत्रैव, पृ.क. 209.
18) तत्रैव, पृ.क. 284,285.
19) तत्रैव, पृ.क. 255.
20) तत्रैव, पृ.क. 255.
21) तत्रैव, पृ.क. 281.
22) तत्रैव, पृ.क. 273.
23) तत्रैव, पृ.क. 255.
24) तत्रैव, पृ.क. 229.
25) तत्रैव, पृ.क.195
26) तत्रैव, पृ.क.264.
27) Patil P.G., The Bountiful Banyan-A Biography of Karmveer Bhaurao Patil. Volume-3, P.N.256.
28) मोघे सुधीर यांचे गीत, 'संघर्ष' मालिकेचे शीर्षक गीत.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net